**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी - चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला,
चिंचवड पुणे ४११०३३,

जा.क्र पोउआ/वाहतूक/उपक्रम/ ई- /२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक ०७ /१२/२०२३

# प्रेसनोट

## वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

पुणे शहर हे शिक्षणाचे माहेरघर म्हणुन संबोधिले जाते त्यामुळे ब-याच आजुबाजूचे शहरातील, ग्रामीण भागातील मुलं हे शिक्षणासाठी पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहरात शिक्षणासाठी आलेले आहेत. आजचे विद्यार्थी हे आपल्या देशाचे उदयाचे जागृत नागरिक असणार आहेत. या विद्यार्थ्यांना विधायक मार्गाने जीवन जगण्याचे अनुषंगाने पोलीस दलाशी संबंधित वाहतूकीचे नियमन, सायबर गुन्हेगारी, सोशल मिडियाचा वापर, ड्रग्ज व व्यसनाधीनतेपासुन दुर राहणे, महिला व मुलींचा सन्मान करणे, इ.बाबी बाबत शिक्षण देण्याचा हा महत्वाचा टप्पा आहे. सदरची बाब लक्षात घेता वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचेवतीने "एक दिवस शाळेसाठी" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

आज दि. ७/१२/२०२३ रोजी वाहतूक शाखेमार्फत २० टिमच्या माध्यमातुन , निवडलेल्या २० शाळांमधुन सुमारे ७००० हजार विद्यार्थ्यांपर्यत पोहचुन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदरचे नियोजन पोउनि. श्री. इंगळे, मसहापोउपनि. भोसले, पोहवा १५३८ लोखंडे यांच्या वतीने करण्यात आले. यास सर्व शाळा व विदयार्थ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असुन यामधुन आजचे विद्यार्थी उद्याचे जबाबदार नागरिक होण्यास मदत होणार आहे.

वरील उपक्रम मा. श्री. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बापू बांगर पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा , श्री. कसबे सहायक पोलीस आयुक्त -२ वाहतूक शाखा, श्री. डेरे सहायक पोलीस आयुक्त-१ वाहतूक शाखा व वाहतूक शाखेचे सर्व पोलीस अधिकारी तसेच अंमलदार यांचे मार्फतीने दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी यशस्वीपणे राबविण्यात आला.

07/12/2023.

(बापु बांगर)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

प्रतः १) पोलीस निरीक्षक प्रेसरूम पोलीस आयुक्त, कार्यालय, पिंपरी चिंचवड
२) सर्व संपादक/ वार्ताहर, सर्व लोकप्रिय वृत्तपत्रे.


ज्ञानवर्धिनी विद्यालय, चाकण
BHAMA ENGLISH MEDIUM SCHOOL, CHAKAN
स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
ज्ञानवर्धिनी विद्यालय, चाकण.
BHAMA ENGLISH MEDIUM SCHOOL,CHAKAN.
स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चाकण.


पिंपरी - चिंचवड
पोलीस आयुक्तालय
एक दिवस शाळेसाठी
तळेगाव दाभाडे वाहतुक विभाग





